CNRMHPA220001082021

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | १६/०२/२०२१ |
| नोंदणी तारीख | : | १६/०२/२०२१ |
| निकाल तारीख | : | ०३/०७/२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०५ ०४ १७ |

भाग 'अ'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (I))

**पालम येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी मनिषा म. पाटील)**
**(जाहीर दिनांक – ०३/०७/२०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १८/२०२१**
(गु.र.क्र. १४५/२०२० पालम पोलीस ठाणे)
**निशाणी क्रमांक – ६२**

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार तर्फे**<br>**पोलीस निरीक्षक,**<br>पालम पोलीस ठाणे, ता. पालम, जि. परभणी |
| **प्रतिनिधीत्व** | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता**<br>**श्री. एस. एन. डावकरे** |
| **आरोपी** | **गजानन रामकिशन कराळे**<br>वय – २२ वर्षे, व्यवसाय– शेती<br>रा. पारवा, ता. पालम, जि. परभणी |
| **प्रतिनिधीत्व** | **आरोपीकरीता वकील श्री. ए. एम. खतीब** |

भाग 'ब'
(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | १३/०७/२०२० |
| फिर्याद पोलीस ठाण्यात नोंद झाल्याची तारीख | २२/०७/२०२० |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केल्याची तारीख | १६/०२/२०२१ |

| | |
|---|---|
| आरोपींचे प्रतिकथन नोंदवल्याची तारीख | ०८/०४/२०२२ |
| पुरावा नोंदविण्यास प्रारंभ केल्याची तारीख | ०६/०५/२०२४ |
| निकालाची आरक्षीत तारीख | ०३/०७/२०२६ |
| निकालाची तारीख | ०३/०७/२०२६ |
| जर शिक्षा दिली तर त्या आदेशाची तारीख | लागू नाही. |

## आरोपीचा तपशील

| आ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप ठेवलेले गुन्हे | निर्दोष मुक्त केले की शिक्षा केली | दिलेली शिक्षा | फौप्रसं कलम ४२८ करिता संपरीक्षे दरम्यान निरुध्द केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गजानन रामकिशन कराळे | फौ.प्र.सं. कलम ४१-अ अन्वये नोटीस दिली | ०८/०४/२०२२ | भा.द.सं. कलम २७९, ३३८ व ४२७ | निर्दोष मुक्त केले. | -- | निर्दोष मुक्त केल्यामुळे लागू होत नाही. |

भाग 'क'

(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (**iii**))

## सरकारी/बचाव/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.१ | विठ्ठल श्रीराम कुरे | साक्षीदार |
| अ.सा.२ | काशीनाथ श्रीराम कुरे | साक्षीदार |
| अ.सा.३ | ज्ञानोबा हरीभाऊ कुरे | घटनास्थळ पंच |
| अ.सा.४ | सोमनाथ काशीनाथ कुरे | फिर्यादी |

## ब. बचावाचे साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## क. न्यायालयीन साक्षीदार

| क्रमांक | नाव | **पुराव्याचे स्वरुप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| नाही. | | | |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

## अ. सरकारी

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | ३८/अ.सा.क्र.३ | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| २. | ५१/अ.सा.क्र.४ | फिर्याद |
| ३. | ५२/अ.सा.क्र.४ | प्रथम खबरी अहवाल |

**ब. बचाव**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

**क. न्यायालयीन निशाण्या**

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| नाही. | | |

**मुद्देमाल**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| - | -- | -- |

## न्यायनिर्णय

### (जाहीर दिनांक ०३/०७/२०२६)

प्रस्तुतचा खटला हा आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३८ व ४२७ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्यासाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

दिनांक १३/०७/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास यातील फिर्यादी सोमनाथ हे त्यांची होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल क्र. एम–एच–२०–व्ही. डब्ल्यु.–४०१६ (संक्षिप्तेकरीता यापुढे **'मोटार सायकल'** असे संबोधण्यात येईल) वरून डिग्रस ते भोगाव येथे दर्शनाकरिता जात होते. पिंपळगाव ते भोगावच्या मधील रोडवर दुपारी १२.०० वाजण्याच्या सुमारास ते आले असता, आरोपीने त्याच्या ताब्यातील जे.सी.बी. जे.सी.बी.क्र.एम.एच.२६.बी.२८९२ (संक्षिप्तेकरीता यापुढे **'जे.सी.बी.'** असे संबोधण्यात येईल) हा हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन रोडच्या डाव्या बाजुने असलेल्या पाणंद रस्त्याने रोडवर येत असताना त्याने रोडवरील वाहनांचा अंदाज न घेता टर्न मारला आणि फिर्यादी चालवत असलेल्या मोटार सायकलला डाव्या बाजुने जोराची धडक दिली. सदर धडकेमुळे फिर्यादीच्या डाव्या पिंढरीवर जबर मार लागुन फिर्यादीचा पाय फ्रॅक्चर झाला व त्यांना गंभीर दुखापत झाली. तसेच मोटार सायकलचे देखील हेडलाईट व इतर भाग फुटून नुकसान झाले म्हणुन फिर्यादीने आरोपीच्याविरूध्द फिर्याद दाखल केली.

**३.** सदर फिर्यादीवरुन पालम पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नंबर १४५/२०२० ने प्रथम खबरी अहवाल नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार श्री. के. आर. साठे, पोलीस ठाणे, पालम यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले, जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. तपासाअंती आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आलेने त्यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३८ व ४२७ प्रमाणे दंडनिय अपराध केल्याबाबतचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**४.** माझे पुर्व अधिकारी यांनी आरोपीस भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३८ व ४२७ प्रमाणे अपराधाचा तपशील **(नि.९)** वाचून व समजावून सांगितला. आरोपीने गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले व संपरिक्षेची मागणी केली.

**५.** आरोपीविरुध्दच्या गुन्ह्याच्या सिध्दतेकरीता अभियोग पक्षातर्फे या न्यायनिर्णयाच्या भाग 'क' मधील साक्षीपुराव्याचा आधार घेतला. तद्नंतर अभियोग पक्षाने उर्वरीत साक्षीदारांना हजर ठेवुन त्यांना तपासले नसल्याने त्यांचा पुरावा बंद केला. अभियोग पक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या साक्षीवरून आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा आढळून आल्याने **नि. ६०** कडे आरोपीचे निवेदन नोंदवण्यात आले.

**६.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील ***श्री. एस. एन. डावकरे*** व आरोपींतर्फे वकील ***श्री. ए. एम. खतीब*** यांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणाचा अभिलेख पाहता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि. १३/०७/२०२० रोजी १२.०० वाजण्याच्या सुमारास मौजे भोगाव ता. पालम, जि. परभणी येथील पिंपळगाव ते भोगाव या रोडवर आरोपीने त्याच्या ताब्यातील जे.सी.बी.क्र. एम.एच.२६.बी.२८९२ हा मानवी जिवीत धोक्यात येईल अगर अन्य व्यक्तीला दुखापत किंवा नुकसान पोहोचवण्याचा संभव आहे ईतक्या बेदरकारपणे व हयगयीने सार्वजनीक रस्त्यावरून चालवल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |

| | | |
|---|---|---|
| २. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील जे.सी.बी. वाहन क्र. एम–एच–२६–बी.क्यु–२८९२ हा हयगयीने व बेदरकारपणे चालवुन फिर्यादीला धडक देऊन त्यांच्या डाव्या पायाच्या पिंढरीवर मार लागुन त्यास गंभीर दुखापत पोहचवल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ३. | वर नमुद वेळी, दिवशी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील जे.सी.बी. वाहन क्र. एम–एच–२६–बी.क्यु–२८९२ हा बेदरकारपणे व हयगयीने चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक देऊन त्यांच्या मोटार सायकलचे अंदाजे रू. २०,०००/– नुकसान घडवुन आगळीक केली असल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ४. | काय आदेश ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते.** |

**<u>कारणमिमांसा</u>**

**<u>मुद्दा क्र. १ ते ३ करीताः–</u>**

**७.** मुद्दा क्र.१ ते ३ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याचे विवेचन करताना घटनांची पुर्नरावृत्ती टाळण्यासाठी ते चर्चेकरिता एकत्रात घेण्यात आले आहेत.

८. सदर प्रकरणी अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात आलेला तोंडी व लेखी पुरावा तसेच आरोपीविरूध्द नोंद असलेल्या गुन्ह्याचे अनुषंगिक घटक यांचा सारासार विचार करता आरोपीने त्याच्या ताब्यातील जे. सी. बी. हा घटनास्थळी हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन टर्न मारत असताना फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक दिली आणि फिर्यादीला गंभीर दुखापत पोहचवली तसेच फिर्यादीच्या मोटार सायकलचे नुकसान केले असल्याचे अभियोग पक्षाने निःसंशयरित्या सिध्द केले आहे का हे पाहणे आवश्यक आहे.

९. आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने याकामी नि. ५० कडे **<u>सा.क्र.४ सोमनाथ</u>** यांची साक्ष नोंदवली आहे. त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान कथन केले

आहे की, दि. १३/०७/२०२० रोजी दुपारी ११.०० ते १२.०० वाजण्याच्या दरम्यान ते त्यांच्या मोटार सायकलवरून भोगावकडे जात असताना पिंपळगाव ते भोगाव या दरम्यान असणाऱ्या वळणावर घटना घडली होती. त्यादिवशी घटनास्थळी जे.सी.बी. चालकाने जे.सी.बी. चालवुन रस्त्याने आणली आणि त्यांच्या मोटार सायकलला धडक दिली. त्यामुळे त्यांचा डावा पाय फ्रॅक्चर झाला. जे.सी.बी. ने धडक दिल्यामुळे ते खाली पडले त्यामुळे त्यांना पाठीला, पोटाला व डाव्या पायाला मार लागला होता. सदर जे.सी.बी.ने धडक दिल्यामुळे त्यांच्या मोटार सायकलचे टायर फुटले. आरोपी गजानन हा घटनेवेळी जे.सी.बी. चालवत होता. जे.सी.बी.चा मालक हा कुशब एडके होता. अपघात झाल्यानंतर आरोपीने जे.सी.बी.च्या मालकाला फोन केला आणि घटनास्थळावरून पळुन गेला. त्यांना दुखापत झाल्यामुळे त्यांना आधार हॉस्पीटल नांदेड येथे पाठवण्यात आले व त्यांच्यावर उपचार करण्यात आले. सात ते आठ दिवसांनी त्यांनी पोलीस स्टेशनला जावुन **तक्रार (नि.५१)** दिली. त्यांनी दिलेल्या फिर्यादवरून **प्रथम खबरी अहवाल (नि.५२)** नोंदवण्यात आला.

१०. सदर साक्षीदाराच्या उलटतपासादरम्यान असे आले आहे की, ते वयाच्या विसाव्या वर्षीपासुन दुचाकी चालवतात परंतु त्यांच्याकडे दुचाकी चालवण्याचा परवाना नाही. घटना ही डिग्रसपासुन भोगावला जात असताना सातव्या वळणावर घडली होती. घटनास्थळाच्या आजु-बाजुला कोणाची शेती आहे, घटनास्थळी किती लोक जमा झाले होते हे त्यांना सांगता आलेले नाही. घटनास्थळाच्या रस्त्याकडेला झाडे असुन त्या झाडांच्यामुळे पाणंद रस्ते, छोटे रस्ते दिसुन येत नाहीत. त्यांनी मोटार सायकलचे नुकसान झाल्याबाबत कागदपत्रे तपासादरम्यान दिले होते. परंतु ते नेमके कोणाला दिले होते हे त्यांना सांगता आलेले नाही. घटनास्थळी त्यांच्या गावाचे लोक आले नव्हते. जे. सी. बी. मालक व बालाजी यांनी त्यांना घटनेच्यानंतर १५-२० मिनीटांनी घटनास्थळी येवुन त्यांना दवाखान्यात नेले. दवाखान्यात जाण्यापुर्वी ते पालम पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी गेले होते.

११. तद्नंतर अभियोग पक्षाने तपासलेले **<u>सा.क्र. २ काशीनाथ (नि.३०)</u>** यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की घटना ही तीन ते साडेतीन वर्षापुर्वी पिंपळगाव ते भोगाव रोडवर ज्ञानोबा चिवटे यांच्या शेताजवळ घडली होती. घटनेच्यावेळी शेतात असताना त्यांचा भाऊ विठ्ठल याने त्यांना अपघाताबाबतची माहिती दिली. तसेच सोमनाथ याला नांदेड येथील दवाखान्यात भरती केल्याचे सांगितले. त्यांना मिळालेल्या माहितीवरून ते व त्यांची पत्नी आधार हॉस्पीटल, नांदेड येथे गेले. त्याठिकाणी त्यांचा मुलगा म्हणजेच फिर्यादी सोमनाथ

हा होता. घटनेच्या दिवशी सोमनाथ हा मारोती दर्शनासाठी जात असताना जे.सी.बी.ने त्याच्या मोटार सायकलला धडक दिली आणि सोमनाथच्या डाव्या पायाच्या पिंढरीला मार लागुन त्याला गंभीर दुखापत झाली असल्याचे त्यांना सांगितले. जे.सी.बी. वाहन हे निष्काळजीपणे व भरधाव वेगात होते. जे. सी. बी. वाहनाने वळणावर टर्न मारत असताना फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक दिली होती. त्यामुळे जे.सी.बी. मालकाने व बालाजी कुरे यांनी फिर्यादीला नांदेड येथील दवाखान्यात भरती केले. तेथे फिर्यादीवर उपचार करून डाव्या पायात रॉड टाकला असल्याचे त्यांनी पाहिले. फिर्यादीच्या पायाला जी गंभीर दुखापत होवुन मार लागला होता तो जे.सी.बी. चालकामुळे लागला होता.

१२. उलटतपासादरम्यान त्यांनी सा.क्र. १ विठ्ठल व ते सख्खे भाऊ असुन फिर्यादी हा घटनेच्या दिवशी कुठे जाणार होता याबाबत त्यांनी माहिती सांगितली नाही. फिर्यादीच्या मोटार सायकलचा व धडक देणाऱ्या जे.सी.बी.चा नंबर त्यांना सांगता आलेला नाही. घटना ही त्यांची प्रत्यक्ष पाहिलेली नाही. घटना घडल्यानंतर ते घटनास्थळी गेले होते परंतु त्याची निश्चित तारीख, वेळ व वार त्यांना सांगता आलेली नाही.

१३. अभियोग पक्षाने तपासलेले **सा.क्र.१ विठ्ठल (नि.२९)** यांच्या सरतपासात असे आले आहे की, फिर्यादी हा त्यांचा भावाचा मुलगा असुन दि.१३/०७/२०२० रोजी दुपारी १२.०० वाजण्याच्या सुमारास पिंपळगाव ते भोगाव रस्त्यावर ज्ञानोबा दिवटे यांच्या शेताजवळ घटना घडली होती. घटनेच्यादिवशी फिर्यादी हा भोगाव येथील मारोतीच्या दर्शनासाठी जात होता. त्यादिवशी केशव कुरे यांनी त्यांना फोन करून फिर्यादीला कुशेब एडके यांच्या जे.सी.बी.ने धडक दिली आणि बालाजी व कुशेब यांनी फिर्यादीला नांदेड येथे उपचाराकरिता नेले असल्याचे सांगितले. फिर्यादीला डाव्या पायाच्या पिंढरीला मार लागल्यामुळे फ्रॅक्चर झाले होते. फिर्यादीने त्यांना वळणरस्त्यावर एक जे.सी.बी. आली व ती टर्न मारताना त्याच्या गाडीला धडक दिली असल्याचे सांगितले. त्यामुळे मोटार सायकलचे नुकसान झाले होते.

१४. उलटतपासादरम्यान त्यांनी घटना ही प्रत्यक्ष पाहीली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच त्यांना केशवचा मोबाईल नंबर, ज्ञानोबा यांच्या शेताचा सर्वे नंबर व धडक दिलेल्या वाहनाचा नंबर सांगता आलेला नाही. पिंपळगाव ते भोगाव या रस्त्यावर अनेक वळणे असुन कथित घटना ही पावसाळ्याच्या दिवसांत घडली असल्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**१५.** अभियोग पक्षाने तपासलेले **सा.क्र. ४ सोमनाथ** हे फिर्यादी असुन जखमी साक्षीदार आहेत. त्यांनी त्यांच्या साक्षीदरम्यान फिर्यादीप्रमाणेच कथने केली आहेत. त्यांच्या कथनानुसार घटनाही पिंपळगाव ते भोगाव येथे जाणाऱ्या रस्त्यावर दुपारी १२.०० वाजता घडली होती. जे. सी. बी. चालकाने टर्न घेत असताना त्यांच्या मोटार सायकलला धडक दिली व त्यामुळे त्याच्या पायास गंभीर दुखापत झाली होती. मौजे पिंपळगाव ते भोगाव हा रस्ता सार्वजनिक रस्ता असल्याची बाब वादातीत नाही. जे.सी.बी. चालकाने वळण घेताना फिर्यादीस धडक दिली असल्याचे फिर्यादीचे कथन लक्षात घेता सदरचा अपघात प्रत्यक्षदर्शी पाहणारे आणि फिर्यादीच्या कथनास दुजोरा देणारे साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेले नाही. फिर्यादीने त्याला जे.सी.बी. मालक व बालाजी यांनी दवाखान्यात नेले असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्यांची साक्ष अभियोग पक्षाने तपासलेली नाही. ज्या जे.सी.बी.ने फिर्यादीला धडक दिली त्या जे.सी.बी.चा नंबर फिर्यादीला सांगता आलेला नाही. अभियोग पक्षाने तपासलेले सा.क्र. १ **विठ्ठल (नि.२९)** व सा.क्र. २ **काशीनाथ (नि.३२)** हे फिर्यादीचे चुलते व वडील आहेत. ते दोघेही घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत. सा.क्र. १ विठ्ठल (नि.२९) याने केशव कुरे याने फोन करून अपघाता विषयीची माहिती दिली आहे तर विठ्ठल याने काशीनाथ याला फोन करून अपघाता विषयी कळवले. दोघेही ऐकीव साक्षीदार आहेत. दोघांनाही ज्या जे.सी.बी. ने फिर्यादीला धडक दिली होती तिचा नंबर त्यांना सांगता आलेला नाही.

**१६.** आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी घटनास्थळावरील परिस्थिती अभिलेखावर आणणे आवश्यक असते. त्याकरिता अभियोग पक्षाने **सा.क्र. ३ ज्ञानोबा (नि.३७)** यांची साक्ष नोंदवली असुन त्यांनी दि. २२/०७/२०२० रोजी पिंपळगाव ते भोगाव जाणाऱ्या रोडवर ज्ञानोबा दिवटे यांच्या शेताजवळ पोलीस नाईक साठे यांच्यासोबत ते गेले होते. तेथे त्यांना बालाजी कुरे याने घटनास्थळ दाखवले. त्यांच्या समक्ष पोलीसांनी घटनास्थळाची पाहणी केली आणि तसा पंचनामा **(नि.३८)** करून त्यांची व दुसरा पंच हरी याची सही घेतली असल्याचे कथन केले आहे. उलटतपासादरम्यान त्यांनी फिर्यादी सोमनाथ हा त्यांच्या भावकीतील असल्याचे मान्य केले आहे. तसेच पंचनामा हा शेत जमीनीचा केला असल्याचे त्यांनी कथन केले आहे. परंतु, त्या शेतजमीनीचा शेत नंबर त्यांना सांगता आलेला नाही.

**१७.** अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे घटनास्थळ हा सार्वजनिक रस्ता आहे. आरोपी हा जे.सी.बी. टर्न घेताना अपघात झाला आहे. परंतु, आरोपी हा नेमका कोठुन कुठे टर्न

घेत होता याबाबतचा पुरावा पटलावर आलेला नाही. घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता घटनास्थळ हे बालाजी कुरे यांनी दाखवले असल्याचे दिसुन येते. मुळात बालाजी अपघातावेळी घटनास्थळी होते आणि त्यांनी घटनास्थळ अपघात घडताना पाहिले होते असा कोणताही पुरावा पटलावर नाही. फिर्यादी यांनी अपघातावेळी बालाजी हे त्याठिकाणी असल्याचे कथन केलेले नाही. बालाजी हे गुन्ह्याचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असल्याबाबत त्यांची साक्ष अभियोग पक्षाने नोंदवलेली नाही. पंच साक्षीदार यांनी पंचनामा हा शेत जमीनीचा झाला असल्याचे कथन केले आहे. इतर साक्षीदार व घटनास्थळ पंचनाम्यावरून घटनास्थळ हा रस्ता असल्याचे दिसुन येते. जर घटनास्थळ रस्ता होता तर शेत जमीनीत पंचनामा का केला याबाबत कोणतेही स्पष्टीकरण अभियोग पक्षाने दिलेले नाही. अभियोग पक्षाच्या व फिर्यादीच्या कथनाप्रमाणे आरोपी हा पिंपळगाव ते भोगाव या रस्त्याच्या उत्तरेकडील पाणंद रस्त्यावरून येत होता व टर्न घेत असताना फिर्यादीला धडक दिली होती तर त्या अनुषंगाने घटनास्थळ पंचनाम्याचे अवलोकन करता नकाशामध्ये पिंपळगाव ते भोगाव या रस्त्याच्या उत्तर बाजुस पाणंद रस्ता असल्याचे दिसुन येत नाही. तसेच घटनास्थळी वळण असल्याचेही नकाशावरून स्पष्ट होत नाही.

१८. फिर्यादी व सा.क्र. १ व २ यांनी सदर अपघातामध्ये फिर्यादीच्या पायाला मार लागुन त्याचा पाय फ्रॅक्चर झाला होता आणि त्याने त्याकरिता नांदेड येथील दवाखान्यात उपचारही घेतल्याचे कथन केले आहे. परंतु, त्याच्या पुष्ट्यर्थ कोणताही कागदोपत्री पुरावा अभियोग पक्षाने पटलावर आणलेला नाही. वैद्यकीय अधिकारी यांचीही साक्ष नोंदवलेली नाही. मुळात आरोपी विरूध्दचा गुन्हा सिध्द करताना फिर्यादीला गंभीर दुखापत झाली असल्याचे पटलावर आणणे आवश्यक होते. त्याकरिता फिर्यादीला झालेल्या दुखापतींचे स्वरूप निसंशयरित्या अभियोग पक्षाने सिध्द करणे गरजेचे होते. परंतु, सा.क्र. ४ **सोमनाथ** यांची साक्ष वगळता अन्य कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने आरोपीने फिर्यादीला धडक दिली व त्यामध्ये फिर्यादीस गंभीर दुखापत झाल्याचे कथन केलेले नाही.

१९. आरोपीने धडक दिल्यामुळे फिर्यादीची मोटार सायकलचे नुकसान झाले असल्याचे अभियोग पक्षाने कथन केले आहे. त्याकरिता त्यांनी फिर्यादीच्या मोटार सायकलचे नेमके काय नुकसान झाले ही बाब सबळ पुराव्याने पटलावर आणणे आवश्यक होते. याकामी अभियोग पक्षाने फिर्यादीच्या गाडीचे नुकसान झाले असल्याचे तपासणी अहवाल दाखल केलेले नाही अथवा त्या गाडीचे नुकसान झाल्याचे पटलावर आणण्याकरिता तज्ञ साक्षीदाराची

साक्ष नोंदवलेली नाही. सदर गाडीची अपघातावेळी झालेली परिस्थिती ही सविस्तर अशी साक्षीदाराने कथन केलेली नाही. घटनास्थळी गाडीचे भाग तुटून पडले असल्याचे पंचनाम्यावरून दिसुन येत नाही फक्त गाडीचे नुकसान झाले या निव्वळ कथनावरून फिर्यादीच्या मोटार सायकलचे नुकसान झाल्याची बाब सिध्द होत नाही.

२०. आरोपीने त्याच्या ताब्यातील जे.सी.बी. हा भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक दिल्याचे कथन लक्षात घेता आरोपी हा सदरचा जे.सी.बी चालवत होता हे पाहणारा कोणताही स्वतंत्र साक्षीदार अभियोगपक्षाने याकामी तपासलेला नाही. आरोपी हा अपघातानंतर त्याठिकाणाहुन पळुन गेला असल्याचे निव्वळ फिर्यादीने कथन केले आहे. तसेच त्यानंतर त्याठिकाणी कुशेब व बालाजी हे आले होते व त्यांनी फिर्यादीला दवाखान्यात नेले होते तर त्यांनाही याकामी अभियोग पक्षाने तपासलेले नाही. तपासीक अधिकारी यांचीही साक्ष अभियोग पक्षाने नोंदवलेली नाही. घटनेच्यावेळी आरोपीने निष्काळजीपणे व हयगयीने जे.सी.बी. चालवताना त्याने वळण घेता फिर्यादीच्या मोटार सायकलला धडक दिली हे कथन करणारा फिर्यादी व्यतीरिक्त कोणताही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. घटनास्थळी वळण होते ही बाबच पटलावर नाही.

२१. घटना ही दि. १३/०७/२०२० रोजी घडली होती आणि फिर्याद ही दि. २२/०७/२०२० रोजी देण्यात आली आहे. फिर्यादीने दरम्यानच्या काळात तो दवाखान्यात उपचार घेत असल्याचे कथन केले आहे. परंतु, त्याबाबतचा कोणताही पुरावा पटलावर नाही. एकंदरीत अभिलेखावर असलेला पुरावा पाहता आरोपी याने घटनेच्यादिवशी त्याच्या ताब्यातील जे.सी.बी. हे वाहन रस्त्याची परिस्थिती लक्षात न घेता हयगयीने व निष्काळजीपणे चालवले आणि फिर्यादीला धडक दिली त्यातुन फिर्यादी हा गंभीररित्या जखमी झाला असल्याबाबत सबळ पुरावा अभियोग पक्षाने पटलावर आणलेला नाही. सा.क्र. १ विठ्ठल व सा.क्र. २ काशीनाथ हे ऐकीव साक्षीदार आहेत. त्यांनी घटना प्रत्यक्ष पाहिलेली नाही. घटना प्रत्यक्ष पाहणारा एकही साक्षीदार अभियोग पक्षाने तपासलेला नाही. घटनास्थळ पंचनामा व सा.क्र. ३ ज्ञानोबा यांच्या साक्षीमध्ये तफावत आहे. घटनास्थळ पंचनाम्यावरून घटनास्थळी वळण असल्याचे व उत्तरेकडे रस्ता असल्याचेही दिसुन येत नाही. फिर्यादीच्या गाडीचे नुकसान झाल्याचीबाबही सबळ पुराव्याने पटलावर आणलेली नाही. त्यामुळे जो पुरावा पटलावर आहे तो आरोपीला सिध्ददोषी ठरविण्याइतपत पुरेसा नाही.

२२. फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीविरुध्द गुन्हा शाबीतीकरीता अभियोग पक्षाने संशयापलीकडे जाऊन आरोप सिध्द करणे गरजेचे असते. यदाकदाचित अशा प्रक्रियेत संशयाचा एक जरी धागा निर्माण करण्यास आरोपी यशस्वी ठरला असेल तर त्याचा फायदा आरोपीला मिळतो. या खटल्यामध्ये प्रस्तुत आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत होण्याइतपत सबळ पुरावा अभियोग पक्षातर्फे पटलावर आणणेत आलेला नाही. सबब मी **मुद्दा क्र. १ ते ३** बाबत माझे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.४ करीताः–**

२३. उपरोक्त विवेचनावरून अभियोग पक्षाने आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा न्यायालयासमोर आणलेला नाही. या कारणास्तव आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला उचित वाटते. सबब, मी **मुद्दा क्र.४** करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आदेश ::**

१. **आरोपी गजानन रामकिशन कराळे** यांची भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३३८ व ४२७ प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तीक जातमुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे रक्कम रु.५,०००/–चा वैयक्तीक जातमुचलके द्यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येतो.)**

MANISHA MAHADEO PATIL
Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.07.03 16:20:03 +0530

**दिनांक – ०३/०७/२०२६** **(मनिषा म. पाटील)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पालम.**